D zankar sir

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, लेखा विभाग,
क्र.लेखा/९५/कावि/६२०/२०१७
दि. ०७/०७/२०१७

विषय :- नवीन निविदा प्रस्तावित करताना अवलंबिणेचे कार्यपध्दतीबाबत..

संदर्भ :- मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक
क्र.दवनि/१/कावि/३८/२०१५ दि. १३/७/२०१५

**परिपत्रक**

सर्व विभागप्रमुख यांना या परिपत्रकान्वये कळविणेत येते की, सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील विकास कामे व देखभाल दुरुस्तीची कामे निविदेसाठी प्रस्तावित करताना अशा कामांसाठी अंदाजपत्रकात उपलब्ध असलेल्या तरतुद रक्कमेच्या दिडपट रकमेपर्यंतच निविदा काढणेत याव्यात.

तरी यापुढे उपलब्ध तरतुदीच्या दिडपटीपेक्षा जादा रक्कमेचे निविदा विषयक प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करू नयेत. अपवादात्मक परिस्थितीत किंवा काही परिस्थितीत कामाची आवश्यकता व तातडी असल्यास, प्रकरणी अंदाजपत्रकीय तरतुद वर्गीकरणाची कार्यवाही करणे संदर्भात लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/६/कावि/८६/२०१५ दि.४/६/२०१५ नुसार मुख्यलेखापाल, लेखा विभाग यांचा अभिप्राय घेवून, आयुक्त यांचे मान्यतेने सदरचा प्रस्ताव अथवा विषयपत्र सक्षम मान्यतेसाठी पाठविणेत यावे. व अशी मान्यता प्राप्त झालेनंतरच निविदा विषयक कार्यवाही प्रस्तावित करावी.

सदर परिपत्रकाचे सर्व संबधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रति :- सर्व संबधित विभागप्रमुख

---------------- विभाग.